## थोडक्यात पण महत्वाचे



### प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांच्या वाढदिवसानिमित्त छत्र्यांचे वाटप

पुणे (स. गांवकरी) : सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांच्या ६५ व्या वाढदिवसानिमित्त विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात येत आहेत. या मालिकेअंतर्गत पुण्यातील 'आदर्श विद्यालय' प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना छत्र्यांचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या पावसाळ्यातील सुरक्षिततेला प्राधान्य देत त्यांच्या शिक्षणप्रवासाला हातभार लावण्याच्या उद्देशाने हा सामाजिक उपक्रम आयोजित करण्यात आला. शिक्षणाबरोबरच सामाजिक बांधिलकी, संवेदनशीलता आणि समाजहिताची जाणीव जोपासत विद्यार्थ्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे, त्यांच्या दैनंदिन जीवनातील अडचणी कमी करणे आणि समाजात सेवाभावाची प्रेरणा निर्माण करणे, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश होता. या कार्यक्रमावेळी आदर्श विद्यालयाच्या मुख्याध्यापिका नीलिमा लांजेवार, शाळेतील सर्व शिक्षिका, तसेच राम घायतिडक (पाटील), पुणे जिल्हा सरचिटणीस प्रदीप घाडगे, नरसिंग भंडारी आदी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी या उपक्रमाबद्दल आनंद व्यक्त करत 'सूर्यदत्त'चे आभार मानले. प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांच्या ६५ व्या वाढदिवसानिमित्त '६५ वर्षे - ६५ समाजोपयोगी उपक्रम' या संकल्पनेतून 'सूर्यदत्त'च्या उपाध्यक्षा व सचिव सुषमा चोरडिया यांच्या मार्गदर्शनात अनेक सेवाभावी उपक्रम राबविण्यात येत आहेत. शिक्षण, आरोग्य, पर्यावरण, महिला सक्षमीकरण आणि सामाजिक विकास या क्षेत्रांमध्ये सकारात्मक योगदान देण्याचा सूर्यदत्तचा सातत्यपूर्ण प्रयत्न आहे.

### या फ्रेंडशिप डे निमित्त, एअरटेल एक कालातीत परंपरा




पुणे (स. गांवकरी) : २ ऑगस्ट रोजी फ्रेंडशिप डे साजरा होणार असताना, एअरटेलने ग्राहकांना हा प्रसंग साजरा करण्याचा एक नवा मार्ग सादर केला आहे. एअरटेल ॲपद्वारे, वापरकर्ते आता मित्राच्या एअरटेल प्रीपेड नंबरवर रिचार्ज करू शकतात आणि त्यासोबत एक वैयक्तिकृत डिजिटल फ्रेंडशिप बँड जोडू शकतात(२ ऑगस्ट २०२६ पर्यंत वैध) – यामुळे रोजच्या व्यवहाराला एक विचारपूर्वक स्पर्श मिळतो. हा अनुभव वापरकर्ते त्यांच्या मित्राचा एअरटेल प्रीपेड नंबर टाकतात, एक प्रीपेड रिचार्ज निवडतात आणि व्यवहार पूर्ण करतात यापासून सुरू होतो. त्यानंतर, विविध प्रकारच्या मैत्रीसाठी तयार केलेल्या डिजिटल फ्रेंडशिप बँडच्या श्रेणीतून ते निवडू शकतात, ज्यात समाविष्ट आहे: "जिम बडी", "मीम डीलर", "लाँग ड्राइव्ह पार्टनर", "फूडी मित्र", "गॉसिप स्पिलर" आणि "फ्री थेरपिस्ट". एकदा निवडल्यानंतर, फ्रेंडशिप बँड व्हॉट्सॲप किंवा एसएमएसद्वारे, फ्रेंडशिप डेच्या शुभेच्छांसह त्वरित शेअर करता येतो. एसएमएसद्वारे पाठवल्यास पाठवणाऱ्याचे नाव समाविष्ट करण्याची सुविधाही या अनुभवात असू शकते, ज्यामुळे संदेश अधिक वैयक्तिक बनतो. प्राप्तकर्त्यांना नंतर मोहीम पृष्ठाद्वारे दुसऱ्या कोणाला फ्रेंडशिप बँड भेट देऊन ही साखळी पुढे चालू ठेवण्याचा पर्याय दिला जातो. या उपक्रमाद्वारे, एअरटेल आजच्या डिजिटल जगासाठी पारंपारिक फ्रेंडशिप बँडच्या देवाणघेवाणीची पुनर्कल्पना करत आहे. प्रीपेड रिचार्जसोबत एक विचारपूर्ण शुभेच्छा एकत्र करून, कंपनी मैत्री साजरी करण्याचा एक साधा पण अर्थपूर्ण मार्ग ग्राहकांना देत आहे. ही मोहीम एका नेहमीच्या रिचार्जला शेअर करण्यायोग्य अनुभवात रूपांतरित करते, ज्यामुळे मित्रांशी कनेक्ट होणे आणि हा प्रसंग संस्मरणीय पद्धतीने साजरा करणे सोपे होते.

### टोयोटा किर्लोस्कर मोटरने भारतात ऑल-न्यू Hiluxचे लॉन्च केले




मुंबई (स. गांवकरी) : टोयोटा किर्लोस्कर मोटर (TKM) ने आज आयकॉनिक ऑल-न्यू Hilux चे लॉन्च जाहीर केले, ज्यामुळे भारतातील SUV पोर्टफोलिओ अधिक मजबूत झाला आहे. टोयोटाच्या वारशातील विश्वासार्हता, टिकाऊपणा आणि गुणवत्ता यांचे प्रतीक असलेला नवा जनरेशन Hilux दमदार ड्युरेबिलिटी आणि सदैव तयार असलेली क्षमता यांचा संगम आहे, ज्यामुळे बहुपयोगी परफॉर्मन्स मिळतो. IMV प्लॅटफॉर्मवर आधारित ऑल-न्यू Hilux सर्वांगीण वापरासाठी विकसित करण्यात आली आहे. ती हेवी-ड्युटी कामांसाठी अत्यंत टिकाऊ असून शहरी ड्रायव्हिंगसाठी आरामदायी आणि हलक्या ॲडव्हेंचर ड्रायव्हिंगसाठी सक्षम आहे. ही लवचिकता टोयोटाच्या "मोबिलिटी फॉर ऑल" या वचनबद्धतेला अधिक बळकट करते आणि विश्वासार्हतेमुळे ग्राहकांशी दीर्घकालीन नातेसंबंध दृढ करते. नवीन लॉन्चबद्दल प्रतिक्रिया देताना, श्री. मसाकाझू योशिमुरा, चेअरमन, मॅनेजिंग डायरेक्टर आणि चीफ एक्झिक्युटिव्ह ऑफिसर, टोयोटा किर्लोस्कर मोटर म्हणाले, "टोयोटा किर्लोस्कर मोटरमध्ये, ग्राहक-केंद्रितता म्हणजे आज ग्राहकांना काय हवे आहे हे समजून घेणे आणि उद्या ते काय अपेक्षित करतील याची तयारी करणे. भारतात जवळपास तीन दशकांपासून आम्ही ग्राहकांचे ऐकून, भविष्यासाठी गुंतवणूक करून आणि विश्वास, गुणवत्ता व विश्वासार्हतेवर आधारित मोबिलिटी सोल्यूशन्स प्रदान करून सतत वाढत आहोत."

### पुण्यात छत्तीसगड टुरिझम बोर्डचा रोडशो




मुंबई (स. गांवकरी) : छत्तीसगडला विरंगुळा, वन्यजीव, वारसा आणि आध्यात्मिक पर्यटनासाठी उदयोन्मुख पर्यटनस्थळ म्हणून देशभरात अधिक प्रभावीपणे सादर करण्याच्या उद्देशाने छत्तीसगड टुरिझम बोर्ड ने उद्योग भागीदार फिक्की यांच्या सहकार्याने आज पुण्यातील हयात रीजेन्सी येथे यशस्वी छत्तीसगड टुरिझम रोडशो आयोजित केला. या रोडशोमध्ये छत्तीसगडमधील आघाडीचे टूर ऑपरेटर्स, हॉटेल व्यावसायिक आणि ट्रॅव्हल एजंट्स यांनी पुणे तसेच महाराष्ट्रातील पर्यटन व्यवसायाशी संबंधित प्रतिनिधींशी बी२बी नेटवर्किंग आणि चर्चासत्रांद्वारे संवाद साधत व्यावसायिक सहकार्याच्या नव्या संधींचा शोध घेतला. या कार्यक्रमाला छत्तीसगड टुरिझम बोर्ड चे अध्यक्ष श्री नीलू शर्मा, छत्तीसगड टुरिझम बोर्ड चे व्यवस्थापकीय संचालक श्री विवेक आचार्य (आयएफएस) तसेच फिक्की छत्तीसगड टुरिझम समिती चे अध्यक्ष आणि छत्तीसगड ट्रॅव्हल ट्रेड असोसिएशन चे अध्यक्ष श्री जसप्रीत सिंह भाटिया उपस्थित होते. उद्घाटनप्रसंगी बोलताना श्री नीलू शर्मा म्हणाले, "भारतातील प्रमुख पर्यटनस्थळांपैकी एक म्हणून छत्तीसगडची ओळख अधिक बळकट करण्याची संधी मिळाल्याचा आम्हाला आनंद आहे.

## शामकांत शेडगे यांच्या पुढाकारातून कारागृहात व्यसनमुक्तीचा जागर

**१५० हून अधिक बंदीवानांचा उत्स्फूर्त सहभाग; मनोविजय फाउंडेशनच्या माध्यमातून व्यसनांच्या दुष्परिणामांवर प्रभावी मार्गदर्शन**

पुणे : (स. गांवकरी)

येरवडा खुले कारागृहातील बंदीवानांच्या आरोग्यासह त्यांच्या मानसिक आणि सामाजिक पुनर्वसनाला प्राधान्य देत कारागृहाचे अधीक्षक शामकांत शेडगे यांच्या पुढाकारातून व्यसनमुक्तीपर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. महाराष्ट्र कारागृह विभागाच्या 'सुधारणा व पुनर्वसन' धोरणांतर्गत शनिवारी (दि. १ ऑगस्ट २०२६) आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला १५० हून अधिक शिक्षाबंदीवानांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. येरवडा खुले कारागृह आणि पुण्यातील मनोविजय फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने दुपारी साडेचार ते सायंकाळी सहा या वेळेत हा कार्यक्रम पार पडला.




बंदीवानांना व्यसनांच्या विळख्यातून बाहेर पडण्यासाठी मानसिक बळ देणे, व्यसनांमुळे होणाऱ्या शारीरिक, आर्थिक व कौटुंबिक दुष्परिणामांची जाणीव करून देणे आणि सुटकेनंतर त्यांना निरोगी व सन्मानपूर्वक जीवन जगण्यासाठी प्रेरित करणे, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश होता.

हा उपक्रम डॉ. सुहास वारके (भा. पो.से.), अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे; योगेश देसाई, विशेष कारागृह महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे आणि सुनील ढमाळ, कारागृह उपमहानिरीक्षक, पश्चिम विभाग, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी येरवडा खुले कारागृहाचे अधीक्षक शामकांत शेडगे यांनी प्रमुख मार्गदर्शक तथा मनोविजय फाउंडेशनचे सल्लागार निलेश शिंदे यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. बंदीवानांचे केवळ कारावासापुरते व्यवस्थापन न करता त्यांच्या विचारांमध्ये सकारात्मक बदल घडवून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात सन्मानाने परत आणण्यासाठी अशा प्रबोधनात्मक उपक्रमांची आवश्यकता असल्याच्या भूमिकेतून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. निलेश शिंदे यांनी तंबाखू, सिगारेट, मद्य, गांजा तसेच विविध अमली पदार्थांच्या व्यसनामुळे मानवी शरीरावर होणाऱ्या गंभीर दुष्परिणामांची माहिती दिली. व्यसनामुळे व्यक्तीचे शारीरिक व मानसिक आरोग्य बिघडण्याबरोबरच कुटुंबाची आर्थिक आणि सामाजिक घडीही कशी विस्कटते, हे त्यांनी विविध उदाहरणांच्या माध्यमातून स्पष्ट केले. तरुण पिढीमध्ये वाढत असलेल्या व्यसनाधीनतेबाबतही त्यांनी चिंता व्यक्त केली.

महाविद्यालयीन युवक, माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील कर्मचारी तसेच विविध खासगी आस्थापनांमध्ये कार्यरत तरुणांवर जाहिराती, चित्रपट आणि बदलत्या जीवनशैलीचा प्रभाव पडत असल्याचे सांगत व्यसनापासून दूर राहण्याचे आवाहन त्यांनी केले. चुकीच्या मार्गावरून परत फिरणे शक्य असून दृढ इच्छाशक्ती, योग्य समुपदेशन आणि सकारात्मक विचारांच्या जोरावर प्रत्येक व्यक्ती व्यसनमुक्त होऊन समाजात ताठ मानेने व निरोगीपणे जीवन जगू शकते, असा विश्वास त्यांनी बंदीवानांना दिला. व्याख्यानाला उपस्थित बंदीवानांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. अधीक्षक शामकांत शेडगे यांच्या मार्गदर्शनाखाली येरवडा खुले कारागृहात बंदीवानांच्या सुधारणा, आरोग्य आणि पुनर्वसनाच्या दृष्टीने राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांच्या मालिकेतील हा महत्त्वपूर्ण उपक्रम ठरला.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी वरिष्ठ तुरुंग अधिकारी नागेश कांबळे, तुरुंग अधिकारी नागनाथ भानवसे, निशा श्रेयकर, सुभेदार सुनील गायकवाड, चंद्रकांत खांदवे, बालाजी सावंत, हवालदार राजेंद्र धनगर, वैशाली थोरात, महिला कारागृह शिपाई मोनिका लांडगे, मिसबा सय्यद, सुरेखा म्हात्रे तसेच कारागृह शिपाई अशोक होले, विजयकुमार दिवेकर, याकुब शेख आणि महेंद्र लोहकरे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## पोलिसांच्या आशीर्वादाने अवैध दारू विक्री जोमात?

बिलोली : (स. गांवकरी)

राज्य उत्पादन शुल्क विभाग व पोलीस प्रशासनाच्या कथित आशीर्वादाने बिलोली आणि कुंडलवाडी शहरासह तालुक्यातील विविध ग्रामीण भागांत अवैधरित्या देशी दारूची विक्री मोठ्या प्रमाणावर सुरू असल्याचा गंभीर आरोप स्थानिक नागरिकांकडून केला जात आहे. हा अवैध धंदा उघडपणे सुरू असल्याचे चित्र आहे. मिळालेल्या माहितीनुसार, बिलोली,कुंडलवाडी शहरातील काही देशीदारू दुकानातून तर काही बनावट देशीदारू आराळी, आरळी, सावळी, बेलकोणी, कार्ला, बोळेगाव, बडूर, बामणी, आदमपूर, हिंगणी यासह आदी गावामध्ये विविध किराणा दुकाने तसेच ठराविक अड्ड्यांवर दोन युवकाद्वारे दररोज मोटारसायकलवरून अवैधरित्या देशीदारू बाटल्यांच्या पेट्या पुरवठा केल्या जात आहे . या अवैध वाहतुकीमुळे आणि सहज उपलब्धतेमुळे ग्रामीण भागातील तरुणाई व नागरिक मद्याच्या आहारी जात आहेत. यामुळे कौटुंबिक शांतता भंग पावत असून सामाजिक वातावरणावर अत्यंत विपरीत परिणाम होत आहे. इतकेच नव्हे, तर अल्पवयात व्यसनाच्या आहारी गेल्यामुळे अनेक तरुणांच्या आरोग्यावर गंभीर दुष्परिणाम होऊन काहींना आपला जीवही गमवावा लागला आहे.

**प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह**

या संपूर्ण प्रकारावर राज्य उत्पादन शुल्क विभाग आणि स्थानिक पोलीस प्रशासनाकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचा थेट आरोप ग्रामस्थांनी केला आहे. "हप्तेबाजी आणि आशीर्वादाशिवाय एवढ्या मोठ्या प्रमाणात उघडपणे दारू विक्री होऊच शकत नाही," असा संतप्त सूर नागरिकांमधून उमटत आहे.

## घनकचरा व्यवस्थापन कार्यपद्धती, नियोजनामध्ये स्पष्टता हवी

- कंत्राटदाराने घनकचरा व्यवस्थापनाचा स्पष्ट आराखडा सादर करावा
- काकासाहेब चव्हाण यांची मागणी

पुणे : (स. गांवकरी)



घनकचरा व्यवस्थापनासाठी पुणे महानगरपालिकेने कंत्राट देण्यास आमचा विरोध नाही; मात्र, सदर कंत्राटाची कार्यपद्धती, नियोजनातील त्रुटी आणि कचरा व्यवस्थापनाबाबत असलेला स्पष्टतेचा अभाव याला आमचा विरोध आहे. त्यामुळे कार्यपद्धतीत स्पष्टता, नियोजन ठेवून कंत्राटदाराने आधी स्पष्ट आराखडा सादर करावा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे गटनेते काकासाहेब चव्हाण यांनी केली. नुकत्याच (३० जुलै) झालेल्या पुणे महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत घनकचरा व्यवस्थापनाच्या नव्या कंत्राटावरून मोठा गदारोळ झाला होता. याबाबत चव्हाण यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. काकासाहेब चव्हाण म्हणाले, "पुणे शहरातून दररोज मोठ्या प्रमाणात कचरा संकलित केला जात असला, तरी कचऱ्याच्या विल्हेवाटीसाठी महानगरपालिकेकडे स्पष्ट, सक्षम आणि व्यवहार्य कार्यपद्धती उपलब्ध नसल्याचे दिसून येते. माझ्या प्रभाग क्रमांक ३३ मध्ये कचरा उचलला गेला, तर प्रक्रिया केंद्रांमध्ये कचरा स्वीकारला जात नसल्याने अनेक ठिकाणी कचऱ्याचे ढीग साचलेले आहेत. अशा परिस्थितीत केवळ कोट्यवधी रुपयांचे कंत्राट देऊन शहर स्वच्छ होणार नाही. सर्वप्रथम कचऱ्याची प्रक्रिया आणि अंतिम विल्हेवाट नेमकी कशी लावली जाणार, याचा स्पष्ट आराखडा नागरिकांसमोर आणि लोकप्रतिनिधींसमोर ठेवणे आवश्यक आहे." या प्रकल्पातून निर्माण होणाऱ्या टाकाऊ कचऱ्याचे काय होणार, याबाबतही कंत्राटदार किंवा प्रशासनाने कोणतीही ठोस माहिती दिलेली नाही. तसेच हे कंत्राट सुरुवातीला केवळ तीन महिन्यांसाठी देण्यात येत असून, त्यानंतर ते सुरू राहिले नाही तर या कंपनीत काम करणाऱ्या शेकडो कर्मचाऱ्यांच्या रोजगाराचा आणि त्यांच्या कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचा गंभीर प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यामुळे कंत्राटदाराने शहरातील स्वच्छता व्यवस्थापनाचा संपूर्ण आराखडा, तांत्रिक क्षमता, प्रक्रिया व्यवस्था आणि कामकाजाची पद्धत याबाबत सर्व नगरसेवकांसमोर सविस्तर सादरीकरण करावे, अशी आमची मागणी आहे. मात्र या मागणीलाही प्रशासन आणि कंत्राटदाराकडून कोणताही सकारात्मक प्रतिसाद मिळालेला नाही, असे चव्हाण यांनी नमूद केले. निविदेमध्ये अनेक तांत्रिक, आर्थिक आणि प्रशासकीय त्रुटी आहेत. त्यामुळे निविदेची फेरतपासणी आवश्यक आहे. संबंधित विभाग, क्षेत्रीय कार्यालय, अभियंते आणि स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या संयुक्त पाहणीतून प्रत्येक रस्त्याचे प्रत्यक्ष मोजमाप करून अंतिम लांबी निश्चित करण्यात यावी. यांत्रिक झाडण होणाऱ्या रस्त्यांचा समावेश मानवी झाडणकामातून वगळावा. अनेक प्रभागांमध्ये समान रस्त्यांची पुनरावृत्ती झाल्याने रस्त्यांची एकूण लांबी कृत्रिमरीत्या वाढल्याचे दिसून येत आहे. खाजगी गृहनिर्माण संस्थांमधील अंतर्गत रस्त्यांचा समावेश कायदेशीरदृष्ट्या आणि प्रत्यक्ष आवश्यकतेच्या दृष्टीने तपासण्यात यावा. यामुळे महानगरपालिकेच्या कोट्यवधी रुपयांची बचत होऊ शकते. अन्यथा अतिरिक्त मनुष्यबळ, वेतन, वाहनव्यवस्था, पर्यवेक्षण आणि प्रशासकीय खर्चामुळे सार्वजनिक निधीवर अनावश्यक आर्थिक भार पडण्याची शक्यता आहे, असे काकासाहेब नमूद केले.

## नोबल हॉस्पिटल्स अँन्ड रिसर्च सेंटर तर्फे स्तनपानाला प्रोत्साहन देण्यासाठी लॅक्टेशन हेल्पलाइन सुरू

पुणे : (स. गांवकरी)

स्तनपानाला प्रोत्साहन देण्यासाठी आणि स्तनपानावेळेस उद्भवणाऱ्या विविध समस्यांवर समुपदेशन करण्याच्या हेतूने नोबल हॉस्पिटल्स अँन्ड रिसर्च सेंटर तर्फे लॅक्टेशन हेल्पलाइन सुरू करण्यात आली आहे. या उपक्रमाचे उद्घाटन जागतिक स्तनपान सप्ताह निमित्त आयोजित विशेष कार्यक्रमात करण्यात आले.याप्रसंगी पीयुएलए पुणे लेडीज च्या संस्थापिका सोनिया अग्रवाल कोंजेटी, नोबल हॉस्पिटल्स अँन्ड रिसर्च सेंटरचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ.दिलीप माने,समुह कार्यकारी अधिकारी डॉ.संजय पठारे, संचालक एच.के साळे, बालरोग विभागाचे संचालक पी. डी पोटे, एनआयसीयूचे प्रमुख डॉ.अभय महिंद्रे,वरिष्ठ लॅक्टेशन सल्लागार डॉ.संगीता खराटे , एनआयसियु मधील वरिष्ठ सल्लागार डॉ.अनिल खामकर, नवजात शिशू तज्ञ, डॉ सुमित भावसार वैद्यकीय सेवा संचालक मनिषा पाठक आदी




मान्यवर उपस्थित होते. ब्रेस्टफीडिंग फॉर अ सस्टेनेबल स्टार्ट इन लाईफ : स्ट्रेंथन व्हॉट वर्क्स ही या कार्यक्रमाची संकल्पना होती.कार्यक्रमात नवजात शिशु तज्ञ, स्त्रीरोग तज्ञ,लॅक्टेशन कन्सल्टंटस यांचा सहभाग असलेले संवादात्मक सत्र पार पडले.

नोबल हॉस्पिटल्स अँन्ड रिसर्च सेंटर येथील एनआयसीयूचे प्रमुख डॉ.अभय महिंद्रे म्हणाले की,एकीकडे स्तनपानाविषयी जागरूकता वाढत असली तरी राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण (एनएफएचएस -6 ) मध्ये पहिल्या सहा महिन्यापर्यंत होणाऱ्या स्तनपानाचे प्रमाण 63.7 टक्क्यांवरून 55.8 टक्क्यांपर्यंत घटले आहे. स्तनपानाच्या बाबतीत नवमातांना अनेक समस्या उद्भवू शकतात,विशेष करून बाळ जन्मल्यानंतर पहिल्या काही दिवसांत याचे निराकरण न केल्यास स्तनपानावरून दुसऱ्या पर्यायांकडे जाण्याची शक्यता असते. मात्र पहिले सहा महिने स्तनपान व बाळाच्या आरोग्यदायी जीवनाचा पाया असतो.त्यामुळे हे स्तनपान मध्ये बंद पडू नये या हेतूने ही लॅक्टेशन हेल्पलाइन उपयुक्त ठरेल. काही भेडसावणाऱ्या समस्यांमध्ये बाळाची स्तनपानावेळेस स्तनाची पकड नीट न होणे,टंगटाय सारख्या समस्यांमुळे स्तनपान करण्यास अडचणी अशा अनेक समस्यांचा समावेश असू शकतो.अनेक समस्या या वर्तवणूक आणि चिंतेशी निगडीत असतात.या सर्व समस्यांसाठी लॅक्टेशन हेल्पलाइन उपयुक्त होणार असून त्यानंतर गरज पडल्यास क्लिनिकमध्ये जाऊन डॉक्टरांचा सल्ला घेता येईल.

डॉ.महिंद्रे म्हणाले की,या लॅक्टेशन हेल्पलाइनला प्रमाणित कौन्सिलर्सचे पाठबळ आहे.सध्या 16 अशा कौन्सिलर्सचा समावेश असून कुठल्याही वेळेस लॅक्टेशन हेल्पलाइनसाठी 3 ते 4 तज्ञ उपलब्ध असतील. डॉ. दिलीप माने म्हणाले की एकत्रित कुटुंबपध्दती नाहिशी होत चालल्याने नवमातांना मार्गदर्शन मिळणे अवघड झाले असून यामुळे लॅक्टेशन कौन्सिलर्स आणि हेल्पलाइनची भूमिका आणखी महत्त्वाची ठरेल.

या उपक्रमाविषयी बोलताना नोबल हॉस्पिटल्स अँड रिसर्च सेंटरचे उपव्यवस्थापकीय संचालक डॉ. दिविज माने म्हणाले, " स्तनपानासाठीची ही समर्पित हेल्पलाईन असून, नवमातांना योग्य वेळी तज्ज्ञांचे मार्गदर्शन आणि आवश्यक आधार मिळावा या उद्देशाने ती सुरू करण्यात आली आहे. स्तनपान ही नैसर्गिक प्रक्रिया असली तरी सुरुवातीच्या काळात अनेक मातांना विविध शंका आणि अडचणींचा सामना करावा लागतो.



## खेळाडूंची चमकदार कामगिरी

पुणे : (स. गांवकरी)

दक्षिण कोरियातील मुजू येथे नुकत्याच झालेल्या जागतिक तायक्वांदो स्पर्धेत (वर्ल्ड तायक्वांदो कल्चर एक्सपो चॅम्पियनशिप - डब्ल्यूटीसीई) पुण्यातील आर. बी. होरांगी तायक्वांदो दो-जांग असोसिएशनच्या खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी केली. मुजू येथे झालेल्या स्पर्धेत संघाने तीन सुवर्ण, तीन रौप्य आणि तीन कांस्य, तर इंचॉन येथे झालेल्या वर्ल्ड ऑलिम्पिक तायक्वांदो फेडरेशनच्या वतीने झालेल्या स्पर्धेत सहा रौप्य आणि पाच कांस्य पदके जिंकून भारताचा गौरव वाढवला.

मुजूमध्ये झालेल्या स्पर्धेत पूमसे आणि क्योरोगी प्रकारात मंथन देवी व कृती दवे याने यांनी प्रत्येकी एक सुवर्ण व एक रौप्य, आरवी गवारे हिने दोन कांस्य, कल्याणी डफळ हिने एक सुवर्ण व एक कांस्य, तर प्रांजल पानसे हिने एक रौप्य व एक कांस्य पदक जिंकले. इंचॉन येथे झालेल्या स्पर्धेतही उल्लेखनीय कामगिरी करीत पूमसे आणि क्योरुगी प्रकारात मंथन देवी याने दोन रौप्य, कृती दवे हिने एक रौप्य व एक कांस्य, आरवी गवारे हिने एक रौप्य व एक कांस्य, कल्याणी डफळ हिने एक रौप्य व एक कांस्य, प्रांजल पानसे हिने एक रौप्य व एक कांस्य पदक पटकविले.

## महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या पदवीदान समारंभात रुबी हॉल क्लिनिकच्या तेहमी ग्रँट इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग एज्युकेशनचा गौरव

पुणे : (स. गांवकरी)

रुबी हॉल क्लिनिकच्या तेहमी ग्रँट इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग एज्युकेशन (TGINE) ने महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ (MUHS), नाशिक यांच्या २५व्या पदवीदान समारंभात उल्लेखनीय यश संपादन करत ४ विद्यापीठीय सुवर्णपदके आणि १३ विद्यापीठीय गुणवत्ता क्रमांक (University Ranks) मिळवत नर्सिंग शिक्षणातील उत्कृष्टतेचा नवा मानदंड प्रस्थापित केला आहे. नुकत्याच रोजी आयोजित करण्यात आलेल्या या पदवीदान समारंभाचे अध्यक्षस्थान महाराष्ट्राचे राज्यपाल तथा एमयूएचएसचे कुलपती श्री जिष्णू देव वर्मा यांनी भूषविले. या




समारंभाला एआयएमएस, नागपूरचे अध्यक्ष डॉ. अनंत पांढरे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते, तर एमयूएचएसचे अतिरिक्त कार्यभार असलेले कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांचीही प्रमुख उपस्थिती होती. या समारंभातील सर्वात उल्लेखनीय कामगिरी कु. साक्षी संतोष बुरळे यांनी केली. त्यांनी बेसिक बी.एस्सी. नर्सिंग अभ्यासक्रमात विद्यापीठात प्रथम क्रमांक मिळवत दोन प्रतिष्ठित विद्यापीठीय सुवर्णपदके पटकावली. अंतिम वर्षाच्या बेसिक बी.एस्सी. नर्सिंग परीक्षेत सर्वाधिक गुण मिळवल्याबद्दल त्यांना सर डॉ. एम. एस. गोसावी प्लॅटिनम ज्युबिली नर्सिंग गोल्ड मेडल प्रदान करण्यात आले. तसेच प्रथम ते चौथ्या वर्षापर्यंतच्या एकूण गुणांमध्ये सर्वोच्च स्थान मिळवल्याबद्दल त्यांना कुलगुरू सुवर्णपदक (Vice-Chancellor's Gold Medal) प्रदान करण्यात आले. कु. साक्षी यांच्या या यशासह संस्थेच्या विद्यार्थ्यांनी एकूण ४ विद्यापीठीय सुवर्णपदके आणि १३ विद्यापीठीय गुणवत्ता क्रमांक मिळवत संस्थेच्या सातत्यपूर्ण शैक्षणिक गुणवत्तेची साक्ष दिली. यावेळी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या नर्सिंग विद्याशाखेच्या अधिष्ठाता तसेच तेहमी ग्रँट इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग एज्युकेशनच्या प्राध्यापक व उपप्राचार्या डॉ. श्रीलेखा राजेश यांनी विद्यार्थी, प्राध्यापक आणि व्यवस्थापनाचे अभिनंदन केले.

त्या म्हणाल्या, "ही उल्लेखनीय कामगिरी टीजीआयएनईच्या शैक्षणिक उत्कृष्टतेप्रती असलेल्या दृढ बांधिलकीचे प्रतीक आहे. उत्कृष्ट शिक्षण, क्लिनिकल प्रॅक्टिस, संशोधन, नवोपक्रम आणि नेतृत्व यांच्या माध्यमातून आम्ही सक्षम, संवेदनशील, नैतिक मूल्ये जपणारे आणि जागतिक स्तरावर स्पर्धा करू शकणारे नर्सिंग व्यावसायिक घडविण्याचे कार्य सातत्याने करत आहोत." तेहमी ग्रँट इन्स्टिट्यूट ऑफ नर्सिंग एज्युकेशनच्या व्यवस्थापनानेही सर्व पुरस्कार विजेते विद्यार्थी, प्राध्यापक, पालक, माजी विद्यार्थी आणि सर्व हितधारकांचे अभिनंदन केले. संस्थेने नर्सिंग शिक्षणातील सर्वोच्च गुणवत्ता कायम राखण्याचा आणि समाज तसेच आरोग्यसेवा क्षेत्रासाठी कुशल, संवेदनशील आणि समर्पित नर्सिंग व्यावसायिक घडविण्याचा आपला संकल्प पुन्हा एकदा व्यक्त केला.